मंत्रालय/नवीन प्रशासन भवन येथे येणा-या अभ्यगतांनी /क्षेत्रिय स्तरावरील शासकीय अधिकारी/कर्मचारी व मंत्रालयीन अधिकारी /कर्मचारी यांनी त्यांचे प्रवेशपास/ओळखपत्र दर्शनी भागावर लावणेबाबत......

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण-१०१७/प्र.क्र.५२६/विशा-४.

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

२ रा मजला, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक :- ०६ ऑक्टोंबर, २०१७.

वाचा:- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.संकीर्ण-२०१४/प्र.क्र.१६/१८(र. व का.), दिनांक ७ मे, २०१४

शासन परिपत्रक:-

मंत्रालय / नवीन प्रशासन भवन येथील सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून मंत्रालयाच्या प्रवेशव्दारावर अभ्यगतांना देण्यात येणा-या प्रवेशपासच्या प्रक्रियेमध्ये बदल करण्यात आला आहे. अभ्यगतांना तसेच क्षेत्रिय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात आलेला प्रवेशपास त्यांनी मंत्रालय / नवीन प्रशासन भवन येथे वावर असेपर्यत दर्शनी भागावर लावणे बंधनकारक राहील. तसेच बाहेर जातेवेळी प्रवेशद्वारावर तैनात असलेल्या पोलीसांकडे परत करावा. मंत्रालय सुरक्षा विभागाने याची प्रभावीपणे अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी.

२. संदर्भीय सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकान्वये राज्य शासनातील सर्व शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांनी कार्यालयात असतांना त्यांचे ओळखपत्र दर्शनीभागावर लावणे सक्तीचे करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे, मंत्रालयातील अधिकारी /कर्मचारी यांनी त्यांचे शासकीय ओळखपत्र दर्शनी भागावर लावणे आवश्यक आहे. मंत्रालयातील प्रशासकीय विभागांच्या सर्व आस्थापना प्रमुखांनी सदर बाब त्यांच्या अधिनस्त असलेले मंत्रालयातील अधिकारी /कर्मचारी यांच्या पुन्हा निदर्शनास आणावी व सदर सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

३. मंत्रालयात येणा-या वाहनांना सुरक्षिततेच्या कारणास्तव आणि उपलब्ध पार्कींग विचारात घेऊन गृह विभागाकडून पार्कींग करीता निळया रंगाचा प्रवेशपास आणि ड्रॉपिंग साठी लाल रंगाचा प्रवेशपास देण्यात आला आहे. त्यामुळे मंत्रालयातील परिसरात फक्त निळया रंगाचा पास असलेल्या वाहनांना पार्कींग करण्यास मान्यता द्यावी. लाल रंगाचा पास असलेल्या वाहनांना पार्कींग करण्यास मान्यता देण्यात येऊ नये. या प्रकरणी अंमलबजावणी करण्याची मंत्रालय सुरक्षा अधिका-यांनी दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७१००६१२०८४५७९२९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Sumit Mullick
Date: 2017.10.06 13:22:09
+05'30'

(सुमीत मल्लिक)
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
२. मा.सभापती, विधानपरिषद यांचे सचिव, विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
३. मा.अध्यक्ष, विधानसभा यांचे सचिव, विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
४. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा.उपसभापती, विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय,मुंबई
६. मा.उपाध्यक्ष, विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय,मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय,मुंबई
८. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानमंडळ सचिवालय,मुंबई
९. सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
१०.मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय,मुंबई
११.सर्व अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, मंत्रालय,मुंबई यांना विनंती की सदर सुचना त्यांनी त्यांच्या अधिनिस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयाच्या निर्दशनास आणव्यात.
१२.प्रधान सचिव,विधान भवन,विधानमंडळ सचिवालय,मुंबई
१३.महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
१४.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५.पोलीस आयुक्त, मुंबई
१६.पोलीस उपायुक्त, मंत्रालय सुरक्षा, मंत्रालय, मुंबई.
१७.निवडनस्ती- विशा-४, गृह विभाग.